



RNI No. - MAHMAR 2023/84526

# विदर्भ प्रजासत्ताक


https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com

❑ वर्ष - १ ❑ अंक -२४२ ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ मंगळवार दि.२८ नोव्हेंबर २०२३ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## राष्ट्रवादी पक्ष आमचाच, अजित पवार गटाकडून दावा, विधिमंडळात २६० पानी उत्तर सादर

**दि.२८ विदर्भ प्रजासत्ताक मुंबई**

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अजित पवार यांनी वेगळी भूमिका काही आमदारांनासोबत घेऊन शिंदे-फडणवीस सरकारमध्ये सामील होण्याचा निर्णय घेतला. या घटनेनंतर राष्ट्रवादी काँग्रेसमध्येअजित पवार आणि शरद पवार असे दोन गट पडल्याचे पाहायला मिळाले. आता दोन्ही गटाकडून राष्ट्रवादी पक्ष आणि पक्ष चिन्हावर दावा केला जात आहे. दरम्यान, विधीमंडळात सादर केलेल्या उत्तरात राष्ट्रवादी पक्ष मूळ आमचाच असल्याचा दावा अजित पवार गटाने केला आहे.



राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील उभ्या फूटीनंतर पक्षविरोधी कृती केल्यामुळे आपल्याला अपात्र का करू नये, अशी याचिका अजित पवार यांच्या गटाने विधीमंडळात दाखल केली आहे. या याचिकेनंतर या संदर्भात आप-आपले म्हणणे मांडण्यासाठी विधीमंडळाने शरद पवार गट तसेच अजित पवार गटातील आमदारांना नोटीस बजावली होती. यावर अजित पवार गटाच्या वतीने उत्तर देण्यात आले आहे. अजित पवार गटाच्यावतीने या संदर्भात विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी पाठवलेल्या नोटीसीला अजित पवार गटाकून विधिमंडळात २६० पानी उत्तर सादर केलं आहे.

याचबरोबर, उत्तरात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष मूळ आमचाच आहे, असा दावा करण्यात आला आहे. अजित पवार गटाने दिलेल्या उत्तरात आमचा गट हाच मूळ राष्ट्रवादी आहे, कारण पक्षाचे विधानसभेचे प्रतोद अनिल पाटील हे आमच्या बाजूने आहेत. तसेच आमदारांची संख्या देखील आमच्याकडे जास्त आहे. त्यामुळे मूळ राष्ट्रवादी ही आमची आहे. त्यामुळे यासंदर्भात तात्काळ निर्णय घ्यावा, अशी भूमिका अजित पवार गटाने विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्यासमोर केली आहे.

### शरद पवार गटाच्या आमदारांचं नोटीसला १० पानी उत्तर

दुसरीकडे, विधीमंडळाकडून राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्या गटाच्या आमदारांना नोटीस पाठवण्यात आली होती. आमदार अपात्रतेच्या प्रकरणी ही नोटीस बजावण्यात आली होती. याप्रकरणी शरद पवार गटाच्या आठ आमदारांना नोटीस पाठवण्यात आली होती. या नोटिसीला आता उत्तर देण्यात आले आहे. विधिमंडळाच्या नोटिसीला शरद पवार गटाच्या प्रत्येक आमदाराने विधानसभा अध्यक्षांकडे १० पानी उत्तर सादर केले आहे. त्यामुळे आता विधानसभा अध्यक्ष काय निर्णय घेतात ते पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

## आता लायकी काढली जातेय, राज्यात नवीन वर्णव्यवस्था येतेय : छगन भुजबळ

**दि.२८ विदर्भ प्रजासत्ताक पुणे**

आता राज्यात नवीन वर्णव्यवस्था यायला लागलीय. ही वर्णव्यवस्था वेगळी, आधीची वेगळी होती . आता लायकी काढली जातेय, असं म्हणत राष्ट्रवादी काँग्रेसचे अजित पवार गटाचे नेते आणि राज्याचे अन्न आणि नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी मराठा आंदोलक मनोज जरांगे यांच्यावर निशाणा साधला. महात्मा फुले स्मृतिदिनानिमित्त पुण्यातील महात्मा फुले वाड्यात आयोजित कार्यक्रमात भुजबळ बोलत होते. यावेळी छगन भुजबळांनी नागपुरातील दलित तरुणाला झालेल्या मारहाणीवर भाष्य केलं.



रामटेकमधे फक्त दलित आहे म्हणून मारहाण झाली आणि एक मृत्युमुखी पडला. यावरून लक्षात येते की आपल्याला आणखी किती काम करायचे आहे.अजूनही लहान-मोठा हा फरक केला जातो. प्रत्येकाने महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, शाहू महाराज यांच्याबद्दलची पुस्तके वाचली पाहिजेत. छत्रपती शिवाजी महाराजांबद्दलची पुस्तके तर वाचलीच पाहिजे,असं छगन भुजबळ म्हणाले.

महात्मा गांधी, स्वातंत्र्यवीर सावरकर आणि छत्रपती शाहू महाराज अशा वेगवेगळया वैचारिक छावण्यांमधील लोकांनी महात्मा फुलेंना गौरवलं.भिडे वाड्याचे काम मार्गी लागेल असं वाटतंय. महात्मा फुलेंच्या या वाड्याच्या आजूबाजूला स्मारक उभारणीसाठी काम होणे गरजेचे आहे. त्यासाठी आम्हाला आंदोलन करायला लागणार नाही असं वाटतं.

**आता लायकी काढली जातेय**

आता राज्यात नवीन वर्णव्यवस्था यायला लागली आहे. ही वर्णव्यवस्था वेगळी,आधीची वेगळी होती. आता लायकी काढली जातेय. काही दिवसांपूर्वी वाटलं होतं की वर्णव्यवस्था संपली. पण उष:काल होता होता काळरात्र झाली.अरे पुन्हा आयुष्याच्या पेटवा मशाली.मी कुठल्या समाजाच्या विरोधात नाही. कुठल्याही समाजाच्याविरोधात कोणी असू नाही. सर्वांनी एकत्र राहिले पाहिजे.कोणावर अन्याय झाला नाही पाहिजे, पण अन्याय होत असेल तर तो सहन देखील केला नाही पाहिजे, असं छगन भुजबळ म्हणाले.

## केंद्राच्या योजनांची देशभर 'फिरती' जाहिरात

### देशभरात ३१ राज्यांत, ७० जिल्ह्यांत पोहचविणार माहिती

**दि.२८विदर्भ प्रजासत्ताक मुंबई**

केंद्र सरकारने आपल्या विविध योजनांची माहिती शहरी भागातील लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी वाहनारूढ जाहिराती करण्याचे ठरवले आहे. 'हमारा संकल्प विकसित भारत' या संकल्प यात्रेचे आयोजन करून पंतप्रधान स्वनिधी, उज्ज्वला, मुद्रा लोन, वंदे भारत ट्रेन, खेलो इंडिया अशा विविध १७ योजनांची माहिती पोहोचवण्यासाठी वैशिष्ट्यपूर्ण व्हॅन तयार करण्यात आल्या आहेत.




ही वाहने देशभरातील ३१ राज्यांत विविध शहरांत उभी करण्यात येणार आहेत. त्यात महाराष्ट्र आणि मुंबईत सर्वाधिक जागांवर ही वाहने उभी करण्यात येणार आहेत. मुंबई महापालिकेच्या यंत्रणेला ४९८ जागा निश्चित करण्याचे लक्ष्य देण्यात आले आहे.

केंद्र सरकारच्या विविध योजनांचा प्रचार करण्यासाठी, लाभार्थ्यांची संख्या वाढवण्यासाठी जाहिरात करण्यात येणार आहे. केंद्र सरकारने संपूर्ण देशात वाहनारूढ जाहिरातींच्या माध्यमातून विविध ठिकाणी लोकवस्तीत जाऊन आपल्या योजनांचा प्रचार करण्याचे ठरवले आहे. देशभरात ३१ राज्यांत, ७० जिल्ह्यांत ही वाहने उभी केली जाणार आहेत. त्याकरिता राज्य, जिल्हा, ग्रामपंचायत, स्थानिक स्वराज्य संस्था, सरकारी संस्था यांचीही मदत घेतली जाणार आहे. नागरिकांशी संवादही साधण्यात येणार आहे. लाभार्थ्यांची संख्याही वाढवण्यात येणार आहे. तसेच योजनेतील लाभार्थ्यांचे अनुभव ऐकणे, ते पडताळून बघणे ही कामे या संकल्प यात्रेत केली जाणार आहेत. त्याकरिता शिबिरांचेही आयोजन स्थानिक स्वराज्य संस्थांनी करायचे आहे. त्याकरिता संबंधित विभागांचे अधिकारी यांच्याशी समन्वय करून त्यांनाही शिबिरात सहभागी करून घेतले जाणार आहे.

### महाराष्ट्राला सर्वाधिक लक्ष्य

केंद्र सरकारच्या जाहिराती असलेली ही वाहने उभी करण्यासाठी जागा शोधण्याचे सर्वाधिक लक्ष्य महाराष्ट्राला दिले आहे. राज्याला १७ वाहने देण्यात येतील. त्याखालोखाल उत्तर प्रदेश, तमिळनाडू, कर्नाटक या राज्यांचा समावेश आहे. तर मोठ्या शहरांचा विचार केला, तर मुंबईला सर्वाधिक जागांचे लक्ष्य दिले आहे. तसेच एकमेव मुंबई शहराला चार वाहने दिली आहेत. तर अन्य सर्व शहरांना, जिल्ह्यांना एकेक वाहन दिले आहे. सुमारे २५ हजार लोकसंख्येच्या वस्तीत ही बऱ्यापैकी मोठी जागा निवडायची आहे. मुंबई महापालिकेच्या २४ विभागांना जागा शोधण्याचे काम देण्यात आले आहे. मुंबई महापालिकेच्या नियोजन विभागाकडे ही जबाबदारी देण्यात आली आहे.

## संजय राऊतांच्या करतुतीमुळे आनंद दिघेंवर टाडाची कारवाई; शिवसेनेचा आरोप

**दि.२८ विदर्भ प्रजासत्ताक ठाणे**

संजय राऊत यांनी आनंद दिघेंची मुलाखत 'लोकप्रभा' मध्ये छापली होती आणि त्यामुळेच दिघे यांच्यावर टाडा लावण्याची कारवाई झाली होती, असा आरोप शिवसेना राज्य समन्वयक नरेश म्हस्के यांनी केला आहे. राऊत आणि मातोश्रीने दिघेंचा नेहमीच दुस्वास केला, असा आरोपही त्यांनी केला.



धर्मवीर चित्रपटाच्या पहिल्या भागातील कथा चुकीची होती. काही व्यक्तिमत्वांना मोठे करण्यासाठी चित्रपटाची निर्मिती करण्यात आली होती, म्हणून उद्धव ठाकरे आणि आम्ही चित्रपट मधातून सोडून निघून गेलो होतो. त्याच प्रमाणे धर्मवीर २ मध्ये देखील अशाच प्रकारे चुकीचा असणार असून त्याची कथा देखील चुकीची असणार असल्याचा आरोप खासदार संजय राऊत यांनी केला होता. त्याला शिवसेना राज्य समन्वयक नरेश म्हस्के यांनी प्रतिउत्तर देत राऊत यांच्यावर आरोप केले आहेत.

धर्मवीरच्या पहिल्या भागात काही बंधने होती. त्यामुळे धर्मवीर आनंद दिघे यांना राऊत आणि मंडळी कसा त्रास देत होती, कसे खच्चीकरण करायचे हे दाखवले नव्हते. दिघे यांच्यासोबत नेमके काय झाले होते हे दुसऱ्या भागात आपल्याला कळेलच, असे म्हस्के यांनी सांगितले. दिघे यांचे निधन झाल्यानंतर पहिला प्रश्न विचारला गेला, तो म्हणजे, त्यांची संपत्ती कुठे कुठे आहे, त्या सर्व गोष्टी लोकांसमोर येतील. संजय राऊत आणि मातोश्रीने दिघे यांचा जो दुस्वास केला, तो पहिल्या भागात दाखवता आला नाही. त्यांची इच्छा असावी, या सर्व गोष्टी पुन्हा दाखवाव्यात. त्यामुळे ते अशा पद्धतीने वक्तव्य करत आहे, असा टोलाही त्यांनी लगावला. तसेच उद्धव ठाकरे आणि उरलेली शिवसेना संपविण्याची सुपारी राऊत यांनी शरद पवार यांच्याकडून घेतली असल्याचा आरोपही म्हस्के यांनी केला. धर्मवीर आनंद दिघे आम्ही जगतो, दिघे यांचे आत्मचरित्र लोकांसमोर आणणे हा राजकीय स्वार्थ नसून सामाजिक स्वार्थ असल्याचे देखील त्यांनी यावेळी सांगितले.

## उद्धव ठाकरेंचा काँग्रेसलाच दे धक्का; मिरजेतील बडा नेता लावला गळाला

**दि. २८ विदर्भ प्रजासत्ताक सांगली**

सांगली जिल्ह्यातील मिरज विधानसभा मतदारसंघातून २०१४ची निवडणूक लढलेले काँग्रेस नेते सिद्धार्थ जाधव यांनी पक्षाला सोडचिठ्ठी देत शिवसेनेच्या ठाकरे गटात जाण्याचा निर्णय घेतला आहे. शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत 'मातोश्री'वर आज सिद्धार्थ जाधव आपल्या समर्थकांसह शिवसेनेत प्रवेश करणार आहे.



आगामी विधानसभा डोळ्यांसमोर ठेवून सिद्धार्थ जाधव यांनी ठाकरे गटात प्रवेश करत असल्याचे सांगितले जात आहे. निवडणुकीसाठी काँग्रेस जवळ करणाऱ्या जाधव यांनी ठाकरे गटाचा रस्ता धरला. मात्र, त्याचा काँग्रेसवर किती परिणाम होतो, हे पाहावे लागेल.

सिद्धार्थ जाधव यांनी काँग्रेसच्या तिकिटावर विधानसभेची २०१४ची निवडणूक मिरजमधून लढवली होती. त्यावेळी ते दुसऱ्या क्रमांकावर राहिले होते. पुढील २०१९च्या निवडणुकीत काँग्रेसची ही जागा राष्ट्रवादी-स्वाभिमानीच्या वाट्याला गेली होती. आगामी विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीत ही जागा ठाकरे गटाला सुटण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे, त्यामुळे सिद्धार्थ जाधव हे शिवसेना ठाकरे गटात प्रवेश करणार असल्याची चर्चा आहे. सिद्धार्थ जाधव हे उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत शिवबंधन बांधून शिवसेनेत पक्षप्रवेश करणार आहेत.मिरज विधानसभा मतदारसंघ हा राज्याचे कामगारमंत्री तथा सांगलीचे पालकमंत्री सुरेश खडे यांचा बालेकिल्ला मानला जातो. याच मतदारसंघातून पालकमंत्री खाडे यांनी आपले पुत्र सुशांत खाडे यांना राजकीय वारसा नेमण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. दहीहंडी सोहळ्यात त्यांची चांगलीच चर्चा रंगली होती.

कामगार मंत्र्यांचे सुपुत्र सुशांत खाडे यांच्या विरोधात मंत्र्यांचे एकेकाळचे स्वीय सहायक मोहन व्हनखंडे उभे ठाकण्याची शक्यता आहे. भाजपची ताकद त्यांच्या पाठीमागे उभी आहे. अशा स्थितीत ठाकरे गटात प्रवेश करणारे सिद्धार्थ जाधव यांचा निभाव लागणे कठीण मानले जात आहे. शिवाय पक्ष संघटन, कार्यकर्ते संघटनामध्ये कमी असलेल्या जाधव यांच्या पक्ष सोडण्याने काँग्रेसला काही फरक पडणार नसल्याचे बोलले जात आहे.

## आठवीत शिकणाऱ्या १३ वर्षीय मयंकने जिंकले एक कोटी रुपये; विद्यार्थ्याच्या ज्ञानाने बिग बी देखील थक्क



**दि.२८विदर्भ प्रजासत्ताक मुंबई**

'कौन बनेगा करोडपती १५' हा छोट्या पडद्यावरील लोकप्रिय कार्यक्रम आहे. प्रेक्षकांचं मनोरंजन करण्यासोबत त्यांच्या ज्ञानात भर टाकणारा हा कार्यक्रम आहे. या कार्यक्रमात विविध क्षेत्रातील वेगवेगळ्या वयोगटातील स्पर्धक सहभागी होत असतात. आता आठवीत शिकणाऱ्या १३ वर्षीय मयंकने एक कोटी रुपये जिंकले आहेत. 'मूर्ती लहान पण कीर्ती महान' हे त्याने खरं करुन दाखवलं आहे.

हरियाणा येथील महेंद्रगढमध्ये राहणाऱ्या मयंकच्या कारनाम्याने सर्वांचं लक्ष वेधून घेतलं आहे. हरियाणाचे मुख्यमंत्री मनोहर लाल खट्टर यांनीदेखील मयंकची दखल घेतली आहे. मयंक 'कौन बनेगा करोडपती ज्युनियर'मध्ये सहभागी झाला होता. त्यावेळी त्याने एक कोटी रुपये आपल्या नावे केले आहेत. त्यानंतर मुख्यमंत्री मनोहर लाल खट्टर यांनी मयंकला फोन करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

मुख्यमंत्री मनोहर यांनी मयंकच्या वडिलांसोबत फोनवरुन बोलणं केलं आहे. तसेच त्यांना चंडीगढला येण्याचं आमंत्रण दिलं आहे. तसेच मयंकचा 'कौन बनेगा करोडपती'मधला व्हिडीओ त्यांनी सोशल मीडियावर शेअर केला आहे. व्हिडीओ शेअर करत त्यांनी लिहिलं आहे,हरियाणा येथील महेंद्रगढमधील लाल, आठवीत शिकणाऱ्या मयंकने 'केबीसी ज्युनियर'मध्ये आपलं ज्ञान आणि कौशल्याच्या जोरावर एक कोटी रुपये जिंकले आहेत. मयंकच्या वडिलांचं फोनवरुन अभिनंदन केलं तसेच लेकाच्या पुढील वाटलाचीसाठी त्याला शुभेच्छाही दिल्या आहेत.

मयंकआधी आठ वर्षांचा विराट कौन बनेगा करोडपती या कार्यक्रमात सहभागी झाला होता. छत्तीसगडमधील भिलाई येथे राहणाऱ्या विराटचं एक कोटी रुपयांसाठी विचारलेल्या प्रश्नाचं उत्तर चुकलं होतं. पण विराट छत्तीसगडमधील 'गुगल बॉय' म्हणून लोकप्रिय आहे. आतापर्यंत त्याला ३० पेक्षा अधिक पुरस्कार मिळाले आहेत. केबीसीमध्ये त्याने ३ लाख २० हजार रुपये जिंकले.

**अमिताभ बच्चन यांना हैराण करणारा मयंक**

'कोन बनेगा करोडपती' हा कार्यक्रम वर्षानुवर्षे प्रेक्षकांचं चांगलच मनोरंजन करत आहे. आजही या सिनेमाची चांगलीच क्रेझ आहे. 'कोन बनेगा करोडपती १५' आता 'किड्स ज्युनिअर्स वीक' साजरं करत आहे. या कार्यक्रमात हरियाणा येथील आठ वर्षीय मयंक सहभागी झाला असून आपल्या ज्ञानाच्या जोरावर त्याने एक कोटी रुपये जिंकले आहेत. मयंकच्या ज्ञानाने बिग बीदेखील हैराण झाले होते.

## संपादकीय ......

# पॅकेजचे चक्रव्यूह...!

भगवान श्रीकृष्णाचा आवडता शिष्य आणि सर्वश्रेष्ठ धनुर्धर अर्जुनपुत्र अभिमन्यूला मारणे महाभारताच्या युद्धात सोपे नव्हते. पण गुरू द्रोणाचार्यांनी त्या दिवशी युद्धात पहिल्यांदाच चक्रव्यूह तयार केला. हा चक्रव्यूह भेदून बाहेर पडण्याचे ज्ञान अभिमन्यूजवळ नव्हते. अगदी हीच गोष्ट हेरून द्रोणाचार्यांनी अभिमन्यूला संपवले. अभिमन्यू एक उदाहरण होते, या भारतातील ज्ञानी आणि शूरवीर युवकांचे. पण जवळच्याच लोकांनी घात केला आणि दुखणाऱ्या नसेवर बोट ठेवत अभिमन्यूचा केसाने गळा कापला. बस हाच फंडा आयआयटी झालेल्या भारतीय युवक-युवतींसंदर्भात बहुराष्ट्रीय कंपन्यांनी स्वीकारला आहे. विशेष म्हणजे त्याची वातावरणनिर्मिती संबंधित युवक-युवती दहावीत असल्यापासून सुरू केली जाते. त्यांच्या डोक्यात आयआयटीचे भूत टाकले जाते. मग तो त्याच्या मागे लागतो आणि आयआयटी होताच बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या हातचे बाहुले बनून पॅकेजच्या चक्रव्यूहात अडकतो.

याच विषयाला स्पर्श करीत चांद्रयान-३ मोहिमेचे शिल्पकार इस्रोचे प्रमुख एस. सोमनाथ यांनी छेडला आहे. त्यांच्या मते आयआयटीचे एक टक्काही विद्यार्थी इस्रोत येत नाहीत. कारण काय तर त्यांना तेवढा पगारच मिळत नाही. इस्रोत अभियंता बनल्यावर पहिला पगार ५६ हजार मिळतो. पण त्याच मुलाला बहुराष्ट्रीय कंपन्या पहिला पगार १ ते २ लाख रुपये देतात. मग इस्रो सरकारी संस्था असली, तरी आजच्या मुला-मुलींना पैसा प्यारा आहे. पूर्वी देशासाठी सर्वस्व अर्पण करणारे या भारताच्या मातीत तयार व्हायचे. आता तो जमाना संपला. परिणामी तुम्ही किती पॅकेज देणार अशीच विचारणा काम करण्यापूर्वी उमेदवारांकडून केली जाते. पूर्वी उमेदवार प्रथमत: काम मागायचा अन् नंतर त्याचे कार्य पाहून कंपनी किंवा त्याची वरिष्ठ मंडळी योग्य तो मोबदला ठरवायची. या पद्धतीमुळे कामात गुणवत्ता यायची. आता गुणवत्तायुक्त काम करणारेच मिळत नाहीत. असे का याचे उत्तर शोधावे लागेल. इस्रोत कमी पगार आणि खाजगी कंपन्यांत अधिक वेतन असे का? याविषयी चर्चा करण्याची वेळ आलेली आहे.आयआयटी कॉलेजसाठी भारत सरकारच्या तिजोरीतून पैसा खर्च केला जातो. मग या आयआयटीतून बाहेर पडणाऱ्या सुपीक मेंदूवर आपल्याच भारत सरकारचा पहिला हक्क असायला हवा. पण तसे न होता त्या सुपीक मेंदूचा वापर बहुराष्ट्रीय कंपन्या पॅकेजचा चक्रव्यूह करून करतात. त्यांच्या त्या चक्रव्यूहात लाखो आधुनिक अभिमन्यू संपले आहेत. पुढेही असे ज्ञानी युवक-युवती संपणार आहेत. भलेही त्यांना कोट्यवधी रुपये मिळेल. मात्र, त्यातून या भारताचे अपरिमित नुकसान होईल. एक देश म्हणून विचार केल्यास यापुढे आयआयटीतून बाहेर पडणाऱ्या युवक-युवतींना देशसेवेसाठी सक्ती करायलाच हवी. कदाचित अनेकांना हा अतिरेक वाटेल. त्यांनी खुशाल आडमार्गाने जाऊन देशासोबत फितुरी करावी.

प्रत्यक्षात देशाच्या हिताचा विचार केल्यास प्रत्येक सुपीक मेंदूचा वापर हा प्रथमत: भारतासाठीच झाला पाहिजे. 'राष्ट्र सर्वोपरी' ही भूमिका प्रत्येकाने प्रत्यक्ष अमलात आणायची गरज आहे. या देशातील सुख-सुविधा घ्यायच्या आणि काही देण्याची वेळ आल्यावर येथे पॅकेज बरोबर नाही, असे म्हणत दुसऱ्या देशात जायचे, ही फितुरी करणाऱ्यांना धडा शिकविण्याची योग्य घटिका आलेली आहे. जर येथील पैशांवर ज्ञान मिळवतात तर त्याचा उपयोग याच मातीत राहणाऱ्यांसाठी व्हायला हवा. देशभक्ती सिद्ध करण्यासाठी फक्त सैनिक बनण्याची गरज नाही. तर जे क्षेत्र आपण निवडले त्यातूनही आपण देशसेवा करू शकतो.

# मेळघाटात विजेच्या कडकडाटासह पाऊस

## भीमकुंड, पंचबोल, देवी पॉइंट वर पर्यटकांची गर्दी



**दि.२८ विदर्भ प्रजासत्ताक मेळघाट** – धारणी व चिखलदरा तालुक्यात रविवारी रात्रीपासून सुरू झालेला पाऊस सोमवार दुपारपर्यंत सारखा सुरूच होता. अधून-मधून विजेचा कडकडाट आणि आकाश गर्जना सुरूच होती. ढगाळ वातावरणामुळे पिकांना नुकसान झालेले आहे तर चिखलदरा शहरात आल्हाददायक वातावरणामुळे पर्यटकांची गर्दी वाढलेली आहे. ढगाळ वातावरणामुळे तूर व हरभरा पिकांना घातक मानला जातो. संपूर्ण मेळघाटात रात्रभर विजेचा कडकडाट सुरू होता. चिखलदर्याच्या भीमकुंड, पंचबोल, देवी पॉइंट आणि सक्कर तलावाचे आकर्षण पर्यटकांमध्ये जास्त दिसून आले. सेमाडोह ते चिखलदरा मार्गावरील वातावरण जास्त आल्हाददायक, मनमोहक झाल्याने पर्यटक जंगलात गाड्या उभ्या करून निसर्गाचा आनंद घेताना दिसत होते.

**तिवसा तालुक्यात पिकांचे नुकसान**– तिवसा तालुक्यात अनेक भागांत हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसासह झालेल्या जोरदार हवेमुळे पिकांची दाणादाण उडाली. या पावसाने शेतकर्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान केले. तूर पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले दिसत आहे. तूर पिकाला आलेला फुलोर पूर्णपणे गळला दिसत आहे. तसेच छोट्या प्रमाणात झालेल्या शेंगा सुद्धा खाली पडलेल्या दिसत आहे. अळीचा प्रादुर्भाव सर्वात जास्त ठिकाणी दिसत आहे. तसेच कांदा पिकांच्या रोपांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेच आहे. हरभरा पिकात सुद्धा पावसाचे पाणी साचल्याने मर रोगाचे आक्रमण होण्याची शक्यता आहे. त्याचबरोबर तढणीवर सोडलेल्या संत्रा पिकांचे सुद्धा नुकसान लाखो रुपयांच्या घरात झालेले दिसत आहे. अचानक आलेल्या या पावसामुळे अनेकांची तारांबळ उडाली. हवामान खात्याने अवकाळी पावसाची शक्यता व्यक्त केली होती.

**अचलपूर बाजार समितीत शेतमाल भिजला**– परतवाडा, अचलपूर शहरासह संपूर्ण तालुक्यात रविवारी रात्रीपासून पाऊस पडत आहे. यामुळे शेतशिवारात उभे असलेले कपाशी, तूर पिकासह अचलपूर बाजार समितीत विक्रीसाठी आणलेला शेतमाल काही प्रमाणात अचानक आलेल्या पावसाने भिजला. तालुक्यात मेघगर्जनेसह अवकाळी पावसाने हजेरी लावली. अचानक आलेल्या पावसाने बाजार समितीत विक्रीसाठी आणलेला सोयाबीन, मका काही प्रमाणात भिजला गेला तसेच शेतशिवारात असलेल्या कपाशी व तूर पिकाचे या अवकाळी पावसाने नुकसान झाले आहे.

### नुकसान भरपाईची ठाकुरांची मागणी

प्रशासनाने तात्काळ पंचनामे करून नुकसान भरपाई द्यावी, यात कोणतीच हयगय होऊ नये, अशी मागणी आमदार यशोमती ठाकूर यांनी केली आहे. या पावसामुळे शेतात कापणीसाठी उभ्या असलेल्या सोयाबीन पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले, तसेच वेचणीच्या प्रतीक्षेत असलेल्या कपाशीचे नुकसान झाले. अवेळी पावसाचे संकट दुष्काळात तेरवा महिना ठरला आहे. त्या पृष्ठभूमीवर आमदार यशोमती ठाकूर यांनी नुकसान झालेल्या शेतांचे तात्काळ पंचनामे करून शासकीय मदत देण्याची मागणी केली आहे.

# पश्चिम विदर्भाला अवकाळीचा फटका

## तीन तालुक्यात अतिवृष्टी; ३५ हजार हेक्टरमधील पिकांचे नुकसान



**दि.२८ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती** – विभागात शनिवारी रात्रीपासून सुरू असलेल्या वादळवाऱ्यासह अवकाळीचा बुलडाणा व वाशिम जिल्ह्यास चांगलाच फटका बसला आहे. यामध्ये बुलडाणा जिल्ह्यातील सिंदखेडराजा, देऊळगावराजा व मेहकर या तीन तालुक्यात अतिवृष्टी झाली. २४ तासांत विभागात सरासरी ३३.५ मिमी पावसाची नोंद झाली आहे. या आपत्तीमध्ये वाशिम जिल्ह्यात एकाचा मृत्यू झाला. याशिवाय अकोला जिल्ह्यात ८, बुलडाणा जिल्ह्यात ८६ व वाशिम जिल्ह्यात ९१ शेळ्या-मेंढ्या व एक बैल असे एकूण १८५ लहान-मोठ्या जनावरांचा मृत्यू झाला आहे. याशिवाय बुलडाणा जिल्ह्यात ५२ व वाशिम जिल्ह्यात १ अशा एकूण ५३ घरांची पडझड झाली.

या आपत्तीमध्ये बुलडाणा जिल्ह्यातील ३३,९५१ हेक्टरमधील कपाशी, तूर, फळपिके, ज्वारी व भाजीपाला तसेच वाशिम जिल्ह्यात ४०२ हेक्टरमधील कपाशीचे नुकसान झाल्याचा विभागीय आयुक्त कार्यालयाचा प्राथमिक अहवाल आहे. या २४ तासात बुलडाणा जिल्ह्यात सर्वाधिक ५४.५ मिमी, वाशिम ५०.५, अकोला २८.४, यवतमाळ २७.२ व अमरावती जिल्ह्यात १३.८ मिमी पावसाची नोंद झालेली आहे.

# अयोध्येतून आलेल्या अक्षद कलशाचे पूजन

## तिवस्यात रामभक्तां कडून भव्य स्वागत

**दि.२८ विदर्भ प्रजासत्ताक तिवसा** – अयोध्येत भगवान श्रीराम भव्य मंदिराचे बांधकाम पूर्ण झाले आहे. २२ जानेवारीला या मंदिरात श्रीरामलला विराजमान होणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याहस्ते प्राणप्रतिष्ठा होणार आहे. देशातील सर्व संत, महंत उपस्थित राहणार आहे. श्रीराम जन्मभूमी न्यासाने भारतातील संपूर्ण श्रीराम भक्तांना आपापल्या सोयीने अयोध्येतील भगवान श्रीरामाचे दर्शन घेण्याकरिता निमंत्रणाच्या अक्षदा पाठविल्या आहेत.

अमरावती ग्रामीण जिल्ह्याचे वतीने विश्व हिंदू परिषदेचे जिल्हा महामंत्री रुपेश राऊत यांनी हा अक्षद कलश नागपूरवरून अमरावती जिल्ह्यात आणला. यावेळी कलश यात्रेसोबत विहिपचे पालक डॉ. चिकटे, विभाग मंत्री बंटी पारवानी, विभाग संयोजक सिद्धू सोळंके होते. यावेळी तिवसा शहरात भाजपा कार्यकर्त्यांनी व श्रीराम भक्तांच्या




वतीने भव्य स्वागत करण्यात आले. जय श्रीराम असा गगनभेदी जयघोष यावेळी झाला. हा कलश अमरावतीत आल्यावर कलक्षातील अक्षदा कार्यकर्त्यांच्या मदतीने निमंत्रण स्वरूपात नागरिकांची घरापर्यंत पोहचविण्यात येणार आहे. कलश पूजन व स्वागतासाठी हभप सचिनदेव महाराज, भाजपाचे तिवसा विधानसभा प्रमुख राजेश वानखडे, प्रदेश कार्यकारणी सदस्य निवेदिता चौधरी, रविराज देशमुख व प्रदीप गौरखेडे, निलेश श्रीखंडे, संजय देशमुख, अनिल थुल, सुधीर गोंडसे, हेमंत मुंदाने, अतुल देशमुख, सुधीर वानखडे, दिनेश लांडगे, सुनील बारबुद्धे, प्रकाश पडोळे, राजू मुधोळकर, शुभम बोथे, अनिकेत वानखडे, चेतन वानखडे व कार्यकर्ते उपस्थित होते.




## मुळव्याधचा त्रास होतोय तर आहारात करा याचा समावेश, लगेचच मिळेल आराम

दि.२८ विदर्भ प्रजासत्ताक मूळव्याधची समस्या आता सामान्य आजारा सारखी झाली आहे. बैठ्या कामाच्या पद्धतीमुळे मुळव्याध होण्याचं प्रमाण वाढत आहे. या आजारामुळे अनेकांना उठताना आणि बसताना देखील खूप त्रास होतो. आधी ४५ च्या नंतरच्या वयातील लोकांमध्ये हा आजार आढळून येत होता. पण आता तरुणपणातही मुळव्याध होण्याचं प्रमाण वाढले आहे. मुळव्याधमुळे वेदना आणि जळजळ तर होतेच पण नंतर रक्तस्त्रावही सुरू होतो. मूळव्याधचे दोन प्रकार आहेत, एक रक्तपडणारे मूळव्याध आणि दुसरा मृत मूळव्याध. रक्तरंजित मूळव्याधची समस्या अनेकांना दिसून येते. मूळव्याध मध्ये उद्भवणारे चामखीळ सर्वात वेदनादायक असतात. अशा परिस्थितीत मूळव्याध दूर करण्यासाठी जर तुम्ही तुमच्या आहारात सुरण भाजीचा वापर केला तर तुम्हाला त्याचा खूप फायदा होईल.





**सुरणची भाजी फायदेशीर**

मूळव्याध असलेल्या लोकांनी सुरणचे सेवन सुरु करावे. मुळव्याधमध्ये ते खूपच फायदेशीर ठरते. सुरणमध्ये अँटिऑक्सिडंट्स आणि बीटा कॅरोटीन असते, ज्यामुळे शरीराची प्रतिकारशक्ती वाढते. सुरणमध्ये अनेक जीवनसत्त्वे आणि खनिजे असतात, जे आरोग्यासाठी फायदेशीर असतात. कमी तेल वापरुन बनवलेले सुरण पचायला देखील हलके असते. त्यामुळे जर मुळव्याधचा त्रास असेल तर सुरणचा आहारात समावेश करावा.

**कोणत्या आजारांवर सुरण गुणकारी**

मूळव्याध व्यतिरिक्त कॅन्सरसारख्या आजारात देखील सुरणाची भाजी खूप फायदेशीर आहे. सुरणमुळे पचनक्रिया सुधारते आणि मजबूत होते.

सुरणाच्या भाजीसोबत ताक पिल्याने देखील फायदा होतो. सुरणाचे तुकडे वाफवून घ्या आणि नंतर तिळाच्या तेलात भाजी करु शकता.साधारण महिनाभर दर दुसर्या दिवशी खा आणि त्यावर ताक प्या. यामुळे मूळव्याध हळूहळू कमी होईल.

सुरण कसे बनवावे : सुरण सर्वात आधी चांगले उकळून घ्यावे. उकळताना पाण्यात थोडी तुरटी घालावी. त्यात थोडासा कोकम घालावा. अन्यथा ते तुमचा गळा खवखव करेल.

# शेतीसाहित्य चोरणारी चोरजोडी पोलिसांकडून ट्रॅप; दुचाकी, मोटर पंप जप्त

## नांदगाव खंडेश्वर पोलिसांची कारवाई

**दि.२८ विदर्भ प्रजासत्ताक नांदगाव खंडेश्वर** – शेती साहित्य चोरणाऱ्या दोघांना अटक करण्यात आली. नांदगाव खंडेश्वर पोलिसांनी सोमवारी ही कारवाई केली. रामेश्वर लक्ष्मणराव खंडाते व विकास हरिदास मारब्दे (दोघेही रा. येरड) अशी अटक आरोपींची नावे आहेत. त्यांच्याकडून शेतातील मोटर पंप जप्त करण्यात आला.

नांदगांव खंडेश्वर पोलीस पथक पेट्रोलिंग करित असतांना दोन इसम हे एका दुचाकीवर चांदुर रेल्वे-नांदगांव खंडेश्वर रोडने फिरत असून त्यांच्या जवळ शेतातील मोटरपंप आहे. ते विक्रीच्या उद्देशाने चौकशी करित असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार नाकाबंदी



करून त्या दुचाकीस थांबविले असता दुचाकीवरील रामेश्वर खंडाते व विकास मारब्दे यांच्याकडे मोटर पंप मिळून आला. तो मोटर पंप आपण ऑक्टोबर महिन्यात नांदगाव येथील किशोर जैन यांच्या शेतातून चोरल्याची कबुली त्यांनी दिली. ते त्या मोटरपंपची विल्हेवाट लावण्याच्या उद्देशाने फिरत असल्याचे निष्पन्न झाले. आरोपीकडून चोरीचे मोटारपंप व गुन्हयात वापरलेली दुचाकी जप्त करण्यात आली.

### आणखी काही घटनांचा उलगडा

अटक आरोपींकडून शेती साहित्य चोरीच्या आणखी काही घटनांचा उलगडा होण्याची शक्यता असून पुढील तपास नांदगांव खंडेश्वर पोलीस करित आहेत. पोलीस अधिक्षक विशाल आंनद, अपर पोलीस अधिक्षक विक्रम साळी, उप-विभागीय पोलीस अधिकारी सूर्यकांत जगदाळे यांच्या मार्गदर्शनात नांदगावचे ठाणेदार विशाल पोळकर, पोलीस अंमलदार राजेश हिरेकर, सतिश राठोड, निखिल मेटे, प्रशांत पोकळे, राहुल गजभिये यांच्या पथकाने ही कारवाई केली.

दै.विदर्भ प्रजासत्ताक अंक नि:शुल्क पाहिजे असल्यास आम्हाला तुमच्या नावासह टेक्स मेसेज किंवा व्हाट्सअप करा आमचा मो.नंबर ८६२४९८५६३३ संपर्क करा.

# हवामानावर आधारित फळ पीक विमा योजना कुणाच्या फायद्याची ?

**दि.२८ विदर्भ प्रजासत्ताक मोर्शी –** अमरावती जिल्हा विक्रमी संत्रा उत्पादनासाठी प्रसिद्ध असून जिल्ह्यातील हजारो संत्रा उत्पादक शेतकऱ्यांनी फळ पीक विमा काढून देखील संत्रा फळ पिक विम्याचे ट्रिगर लागून सुद्धा विमा कंपन्यांकडून नुकसानभरपाई दिली जात नसल्याचा आरोप राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुका उपाध्यक्ष रुपेश वाळके यांनी केला आहे. याबाबत आता सरकारने गंभीर दखल घेऊन प्रधानमंत्री फळ पिक विमा योजनेअंतर्गत आंबिया बहार २०२२ – २०२३ वर्षातील हजारो संत्रा उत्पादक शेतकऱ्यांची १३.९३ कोटी




रुपयांची नुकसान भरपाई, तत्काळ जमा करण्याचे आदेश सरकारकडून देण्यात यावे, कृषी आयुक्त हे या योजनेचे नियंत्रण अधिकारी असल्यामुळे या गंभीर मुद्द्यांवर कृषी आयुक्त यांनी अमरावती जिल्ह्यासाठी असलेल्या रिलायन्स इन्शुरन्स फळ पीक कंपनीला काळ्या यादीत टाकण्यासाठी संबंधित कंपनी, अधिकारी किंवा यंत्रणेवर कारवाईची शिफारस करावी अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुका उपाध्यक्ष रुपेश वाळके यांनी केंद्रीय कृषी मंत्री नरेंद्र सिंह तोमर, महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, कृषी मंत्री धनंजय मुंडे,



संचालक कृषी आयुक्तालय पुणे, विभागीय कृषी सहसंचालक अमरावती विभाग अमरावती यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

नैसर्गिक संकटांमुळे शेतीला बसलेल्या फटक्यातून शेतकरी सावरावा, त्याला आर्थिक स्थैर्य मिळावे यासाठी केंद्र सरकारने पंतप्रधान फळ पीक विमा योजना सुरू केली. मात्र, या योजनेतील सदोष तरतुदींमुळे आंबिया बहार संत्रा फळ पीक विमा २०२२–२३ या दुष्काळी वर्षांत संत्रा उत्पादक शेतकऱ्यांनी फळ पीक विमा काढून सुद्धा अमरावती जिल्ह्यातील हजारो संत्रा उत्पादक शेतकरी विमा भरपाईपासून वंचित आहेत. त्यामुळे संत्रा फळ पीक नुकसान भरपाई देण्याचा उद्देश केवळ नावापुरताच आहे का, असा प्रश्न राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुका उपाध्यक्ष रुपेश वाळके यांनी उपस्थित केला आहे.

फळ पीक विमा हा विमा हवामानावर आधारित आहे. हवामानाची इत्थंभूत माहिती व आकडेवारीसाठी विमा कंपन्यांनी स्कायमेट वेदर सर्व्हिस सोबत सामंजस्य करार केला आहे. पर्जन्यमान व हवामानाच्या माहितीसाठी स्कायमेटने ठिकठिकाणी स्वयंचलित यंत्र बसविले आहेत. स्कायमेटने दिलेली माहिती विमा कंपन्यांसह शेतकऱ्यांना मान्य करावी लागते. विम्यासाठी कंपनीने दिलेले ट्रिगर आणि स्कायमेटने दिलेली आकडेवारी व माहिती शेतकऱ्यांनी मान्य केली आहे. मात्र, रिलायन्स जनरल इन्शुरन्स कंपनीने अमरावती व नागपूर जिल्ह्यात संत्र्याच्या अंबिया व मृग बहाराच्या विम्याचा 'क्लेम' देतांना स्कायमेटने दिलेल्या आकडेवारीवर आक्षेप घेऊन आणि क्लेम' नाकारले जात आहेत. रिलायन्स इन्शुरन्स फळ पीक विमा कंपनीने 'ट्रिगर'वर आक्षेप घेऊन 'क्लेम' देण्यास टाळाटाळ करत असल्यामुळे संत्रा उत्पादक शेतकऱ्यांमध्ये विमा कंपनी विरोधात रोष निर्माण होत आहे. ही कंपनी राज्य सरकारचे निर्देशही गांभीर्याने घेतले जात नाही ही शोकांतिका आहे.

### स्वतंत्र धोरणाची आवश्यकता



पंतप्रधान फळ पीक विमा योजनेत– विमा कंपनीने फळ पीक नुकसानाची भरपाई वाटप करण्यासाठी मे महिन्यामध्ये ट्रिगर संपल्यानंतर तीन आठवड्यांच्या आत संपूर्ण भरपाई देणे आवश्यक आहे, मात्र, गेल्या काही वर्षांपासून महाराष्ट्र शासनातील मंत्री विमा कंपन्यांना शासननिर्णय मोडण्याची पूर्ण मोकळीक देत आहेत. विमा भरतांना शेतकऱ्यांना एक दिवसाचीही मुदतवाढ न देणारे शासन भरपाई वाटपात विमा कंपन्यांनी केलेल्या महिनोन् महिन्यांच्या दिरंगाईस मात्र पूर्ण मोकळीक देते. जर या कंपन्यांनी शेतकऱ्यांच्या लुटीतून गोळा केलेल्या नफ्यातून विमा कंपन्याच मालामाल होणार असेल, तर कशाला पाहिजेत या कंपन्या ?

**– रुपेश वाळके** उपाध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष मोर्शी

## रोलर स्केटींग स्पिड इनलाईन स्पर्धेत
# राज्यात 'रुचिका वासनिक'ची उत्तुंग भरारी

**दि.२८ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती, –** नुकत्याच पार पडलेल्या स्पिड स्केंटीग इनलाईन ऑफ महाराष्ट्राच्या वतीने घेण्यात आलेल्या ३३ व्या राज्यस्तरीय स्केंटीग स्पिड इनलाईन स्पर्धेत अमरावतीच्या कु. रुचिका मनोज वासनिक हिने दहा किलोमीटर पॉईंट टु पॉईंट प्रकारात सुवर्ण पदक तसेच रोड एकीमेशन व रिक इलिमेशन प्रकारात काँस्य पदक पटकावून स्केटींग या खेळात अमरावती जिल्ह्याचे नाव रोशन केले आहे. तीच्या या नावलौकीक यशाबद्दल क्रीडा क्षेत्रातील तज्ज्ञांनी व खेळाडूंनी भरभरुन कौतुक होत आहे.

मुंबई विरार येथे दि. १९ ते २२ नोव्हेंबर दरम्यान सपन्न झालेल्या राज्यस्तरीय स्केटींग क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. कु. रुचिका वासनिक हिने ४ ते १७ वर्षे वयोगटात अमरावती डिस्ट्रीक्ट स्केटींग असोशिएशनकडून सहभाग नोंदविला होता.

कु. रुचिका ही आपल्या स्केटींगचा सराव येथील जिल्हा स्टेडियमच्या स्केंटीग रिकवर सायंकाळी ७ ते ८.३० दरम्यान श्याम भोकरे सरांच्या मार्गदर्शनात करीत असते. तीने या आपल्या यशाचे श्रेय असो.चे अध्यक्ष दिलीप खत्री, उपाध्यक्ष रत्नाकर शिरसाट, सचिव श्याम भोकरे, सहसचिव स्वपनिल भोकरे,प्रा. निळकंट चौधरी सर, किशोर



बोरकर सौ. भारती हबर्डे, व मनिबाई गुजराती हायस्कूलच्या मुख्याध्यापिका सौ. अंजली देव मॅडम, व सर्व शिक्षक व शिक्षिका तसेच क्रीडा उपसंचालक संतान सर जिल्हा क्रिडा अधिकारी गणेश जाधव सराना व आपल्या आई–वडिलांना दिले. तिचे संपूर्ण अमरावती जिल्ह्यातून कौतूक होत आहे.

### शंकरराव उर्फ अण्णासाहेब दुधाट यांचे १४ व्या पुण्यस्मरणा निमित्त
# पाथरगाव येथे लोकार्पण सोहळा व भव्य रोगनिदान शिबिर



**दि.२८ विदर्भ प्रजासत्ताक पाथरगाव–** पाथरगाव येथे रविवार रोजी शंकरराव उर्फ अण्णासाहेब दुधाट यांच्या १४ व्या पुण्यस्मरणा निमित्त स्थानिक जि.प.प्रा.म.शाळेच्या प्रवेशद्वाराचा लोकार्पण सोहळा व भव्य रोगनिदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते..या प्रसंगी उद्घाटिका म्हणून आ.यशोमतीताई ठाकूर( माजी पालकमंत्री, माजी मंत्री महिला व बालकल्याण)यांच्या हस्ते प्रवेशद्वाराच्या लोकार्पण सोहळ्याचे उद्घाटन करण्यात आले असून यावेळी प्रमुख अतिथी म्हणून प्रा. विरेंद्रभाऊ जगताप (माजी आमदार,धा.रे.), सिधार्थभाऊ वानखडे (भा.ज.पा.महाराष्ट्र प्रदेश सचिव), जगदिशभाऊ आरेकर(स. कृ.उ.बा.स.चा.रे.), प्रभाकरराव वाघ(मा.न. चा.रे.) संदिपभाऊ गिरासे (नीलय इंड स्ट्रिज,नाशिक) विरेंद्रसिह जाधव (सचिव,अम. जि. कॉ. क.).सुरेंद्रजी दुधाट(अध्यक्ष, पाथरगाव से. स.सो.),सुशीकुमार भोरे(सचिव,शिवशक्ती शिक्षण संस्था,कोठा (वेणी), रंजनाताई गवई, दिलीपभाऊ दुधाट, अनिलजी राठोड,नरेश बारब्दे,डॉ.शरद भोयर,मिलिंद वानखडे,हरिभाऊ मोहोड (संचालक, डी.को.ऑ.बँक अम.)हरीश मोरे, जयवंत देशमुख,उमेश केने,संतोष चव्हाण,रवींद्र मोकळे,सामाजिक कार्यकर्ते झाकीर भाई,आदी मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमाचे आयोजक गेट लाईफ हॉस्पिटलचे तज्ञ,डॉ.स्वप्नील दुधाट हे होते.

या प्रसंगी स्व. भैय्यासहेब ठाकूर,स्व.शंकरराव उर्फ अण्णासाहेब दुधाट,स्व.दादारावजी जाधव, स्व.वाल्मीकराव जगताप तसेच याच तारखेला २००८ मध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेले जवान व मृत्युमुखी पडलेले निष्पाप नागरिक यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

या वेळी ग्रामपंचायत सदस्यांचा मान्यवरांच्या हस्ते शाल व संविधान पुस्तिकेची प्रत देवून अनिता अनिल राठोड,रवींद्र मोकळे,संगीता रामेश्वर मोकळे यांचा सत्कार करण्यात आला. या वेळी उद्घाटीका आ. यशोमतीताई ठाकूर यांनी श्रद्धांजली अर्पण करून कृतज्ञता व्यक्त केली.तसेच प्रा. विरेंद्र जगताप यांनी आपण सुद्धा फुल नाही तर फुलाची पाकळी होऊन समाजातील गोरगरीबांना मदत करून त्यांचा विकास केला पाहिजे हीच खरी श्रद्धांजली ठरेल असे मत व्यक्त केले.

या वेळी दुधाट परिवारातील सर्व सदस्य,आप्तेष्ट,गावातील ज्येष्ठ मंडळी,ग्रामस्थ, परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.स्वप्नील सुरेंद्रजी दुधाट यांनी केले.संचालन डॉ.सोनाली भोरे(दुधाट) यांनी तर आभाप्रदर्शन डॉ.स्वप्नील काळे यांनी केले.कार्यक्रमाचा समारोप संविधानाचे वाचन करून करण्यात आला.

# आयकर न भरणाऱ्या शेतकऱ्यांनाही नोटीस
## शेतकऱ्यांमध्ये संभ्रम, निधी मागितला परत

**दि.२८ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती** –जिल्हाधिकार्यांच्या कार्यालयाकडून प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजने अंतर्गत जो निधी शेतकर्यांना वाटप करण्यात आला होता, त्यातील अपात्र शेतकर्यांना तहसील कार्यालयातून नोटीस देण्यात येत आहे. यामध्ये हे शेतकरी आयकर दाते किंवा इतर कर भरणा करणारे असल्याने पीएम किसान योजने अंतर्गत अपात्र असल्याचे सांगून शेतकर्यांच्या खात्यात जमा झालेली रक्कम नोटीस दिलेल्या तारखेपासून १५ दिवसाच्या आत तलाठ्याकडे धनाकर्ष किंवा धनादेश पद्धतीने तहसीलदारांच्या नावाने परत करावी, असे नोटीसमध्ये नमूद करण्यात आले आहे. परंतु, यामध्ये कित्येक शेतकरी आयकर किंवा इतर कर भरत नसून व पीक विम्याची रक्कम सुद्धा त्यांना प्राप्त झालेली

### पीएम किसान सन्मान निधी योजना



नसतांना अशा शेतकर्यांना या नोटीस पाठवण्यात येत असल्याने शेतकर्यांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे.विशेष म्हणजे, १५ दिवसाची मुदत या नोटीसव्दारे दिली जात असताना काही शेतकर्यांना मात्र ही नोटीस नोटीसवर असलेल्या तारखेची मुदत संपल्यावर मिळाल्याचे दिसत आहे. गेले कित्येक वर्षापासून ज्यांनी या पीएम किसान योजनेचा लाभ घेतला नाही किंवा ज्या शेतकर्यांनी कधी आयकर किंवा इतर कर शासनाला भरला नाही, त्यांना सुद्धा या नोटीस प्राप्त होत असल्याने चुकीचा अहवाल जिल्हाधिकारी कार्यालयाला पाठवण्यात आल्याचे दिसून येत आहे.

### 'ती' यादी केंद्र सरकारकडून आली

मागील तीन–चार वर्षापूर्वीपासून शेतकर्यांच्या बँक खात्यात या योजनेचा निधी जमा झालेला आहे. त्याकरिता शेतकर्यांनी ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरलेले आहे. त्या अर्जानुसार या योजनेसाठी अपात्र, आयकर वा इतर कर भरत असलेल्या शेतकर्यांची यादी ही केंद्र सरकारकडून जिल्हाधिकारी कार्यालयाला ऑनलाईन पद्धतीने प्राप्त झाली आहे. त्या यादीनुसारच आपण तहसील कार्यालयाकडून अपात्र शेतकर्यांना नोटीस पाठवत आहोत. या प्रक्रियेत तहसील कार्यालयाने यादी सादर केली नसल्याची माहिती वरूडचे तहसीलदार रवींद्र चव्हाण यांनी तरूण भारतला दिली आहे.

# गुलाबी थंडीत एक्झिट नाटकाला रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**दि.२८विदर्भ प्रजासत्ताकअमरावती** ६२ व्या महाराष्ट्र राज्य नाट्य स्पर्धे मधे अमरावती केंद्रावरील प्राथमिक फेरीत आज दि. २७ रोजी अरविंद लिमये, सांगली लिखित आणि उषा धावडे दिग्दर्शीत एक्झिट नाटक सादर करण्यात आले. अमरावती मधे सुरु झालेल्या गुलाबी थंडीत या नाटकाला रसिकांचा लक्षणीय उपस्थिती लाभली. सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार आणि संचालक सांस्कृतिक कार्य बिभीषण चावरे यांचे मार्गदर्शनात स्पर्धेची ही प्राथमिक फेरी संपूर्ण महाराष्ट्रात सुरु आहे. पडदा उघडतो तेंव्हा व्यावसायिक नाटकातली जेष्ठ अभिनेत्री देविका हिची मुलाखत सारंग घेत असतो. मुलाखती दरम्यान एक स्वगत म्हणून दाखवताना देविका इमोशनल होते आणि मुलाखत अर्ध्यात सोडून निघून जाते. दुसऱ्या प्रवेशात तो सारंग उर्फ निरंजन देविकाच्या घरी जाऊन तिचा नाटकातून एक्झिट घेण्याचा निर्णय बदलण्याचा प्रयत्न करतो. हा मुलाखत घेणारा खरंच कोण आहे सारंग की निरंजन हे प्रश्नचिन्ह देविका समोरच नाही तर प्रेक्षकांसमोर देखील उभे रहाते आणि येथेच पहिला अंक संपतो . दुसरा अंक उत्कठा वाढत असताना थोडा रहस्यमय होत जातो आणि या सारंग उर्फ निरंजनचे कोडे सुटते आणि त्याची येव्हडी धडपड कशासाठी होती हे देविकाला आणि प्रेक्षकांना सुद्धा उलगडते. देविका आणि



सारंग उर्फ निरंजन असे मुख्य दोनच पात्र या कलकृती मधे आहेत. देविकाची भूमिका मृणाल ढोले हिने तर सरांगची भूमिका किशोर तळोकार यांनी केली आहे. सहकलावन्त शुभांगी करुले हिने राधाच्या भूमिकेला योग्य न्याय दिला आहे. जसजशी स्पर्धा पुढे सरकते आहे तसतसा रसिकांचा प्रतिसाद सुद्धा वाढतो आहे. एक्झिट या नाटकाची निर्मिती शक्तीयुवा बहूउद्देशीय संस्था , अमरावती यांची असून दिग्दर्शन उषा धावडे आणि मृणाल ढोले यांचे आहे. तांत्रिक बाजू म्हणजे नेपथ्य गणेश भोयर ,यांनी तर संगीत नियोजन रोशन प्रजापती , रंगभूषा – निलेश चौधरी, वेशभूषा – महादेव रमेश , प्रकाश योजना – अक्षय सुभाष यांनी सांभाळली.मंगळवार दि. २८ रोजी वैष्णवी आदिवासी संस्था, अमरावती निर्मित, विनोद सुरोसे लिखित व रविना भुरभुरे आणि रिंकू सरोदे दिग्दर्शीत माणुसकी' हे नाटक संत ज्ञानेश्वर नाट्य गृहात सायंकाळी ठीक ७.०० वाजता सादर होईल. रसिक प्रेक्षकांनी कृपया नोंद घ्यावी अशी विनंती स्पर्धा समन्वयक ॲड. चंद्रशेखर डोरले आणि सहसमन्वयक श्रद्धा पाटेकर व विशाल फाटे यांनी केले आहे.

# संविधानाने समानता दिली मात्र देशात आहे का ?– डॉ. सुनील देशमुख
## उपजिल्हाधिकारी अनिल भटकर यांनी केले राज्यघटनेच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन

**दि.२८ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती** भारतीय संविधानाने सर्वच नागरिकांना संधीची समानता दिली आहे.मात्र समानता देशात आहे का? देशातील मुख्य चारही स्तंभला २०१४ पासून धक्का देण्याचे काम होत आहे.लोकहिताच्या कायद्यावर गत चार वर्षापासून निर्णय होत नाहीत.विरोधात बोलल्यास ईडी ची कारवाई केल्या जाते.संविधानाची मूलभूत तत्व सर्व पर्यत पोहचवावी लागेल. जागृती केली नाही तर येणारी पिढी माफ करणार नसल्याचे प्रतिपादन माजी पालकमंत्री डॉ. सुनील देशमुख यांनी केले संविधान दिन आयोजन समितीच्या विद्यमाने ७४ वा संविधान दिन रविवार (ता. २६) रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथील पुतळा परिसरातकरण्यात आले होते.अमरावती तालुका शहर युवक काँग्रेसचे अध्यक्ष वैभव देशमुख,प्रा.ओमप्रकाश झोड,यांचे नेतृत्वात डॉ.पंजाबराव देशमुख यांचे पुतळ्यापासुन ते डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळ संविधान दिनाच्या निमित्ताने एका पदयात्रेचे आयोजन करण्यात आले होते.या पदयात्रेत माजी पालकमंत्री ॲड यशोमतीताई ठाकुर, माजी महापौर विलास इंगोले शहराध्यक्ष बबलू शेखावत सहभागी होते, याप्रसंगी अमरावती जिल्हा काँग्रेस अनुसूचित जाती विभागाचे अध्यक्ष प्रवीण मनोहर यांनी संविधान उद्देशीकेचे वाचन केले.डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला या मान्यवरांनी अभिवादन केले,

कार्यक्रमाला मुख्य अतिथी म्हणून पोलीस आयुक्त नविनचंद्र रेड्डी,उपजिल्हाधिकारी अनिल भटकर,समाज कल्याण,प्रादेशक उपायुक्त सुनिल वारे, होते तर कार्यक्रमाच्या अध्यक्ष ज्येष्ठ विधी तज्ञ, ॲड. डॉ.पी.एस. खडसे होते. प्रमुख अतिथी म्हणून माजी पालक मंत्री डॉ. सुनिल देशमुख, आमदार ,बळवंतराव वानखडे, माजी कुलगुरू डॉ गणेश पाटील, जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष शिरीश जाखड,महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस तथा संविधान दिन आयोजन समितीचे सदस्य किशोर बोरकर, प्राचार्य गोपीचंद मेश्राम,रामेश्वर अंभयकर,प्रा.जगदिश गोर्वधन,रमेश रामटेके, माजी महापौर मिलिंद चिमोट, डॉ.बी.आर.देशमुख भैय्या पवार ,समाधान वानखडे,डॉ कमल राऊत,प्रा.विनायक दुधे, यांच्या सह अन्य मान्यवर धम्मपीठावर विराजमान होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्यास हारार्पण करून अभिवादन करण्यात आले. गेल्या १२ वर्षांपासून संविधान दिन



आयोजन समितीव्दारा, विविध मान्यवरांचे उपस्थितीत संविधान दिनाचे आयोजन करण्यात येत असून देशाचे प्रथम क्रुषीमंत्री डॉ पंजाबराव देशमुख हे सुध्दा संविधान निर्मितीचे सदस्य होते, त्यामुळेच संविधानाची एक मुळ प्रत अत्यंत सन्मानाने शिवाजी शिक्षण संस्थेच्या अमरावती येथील ग्रंथालयात सन्मानपूर्वक ठेवण्यात आली असल्याची महत्वपूर्ण माहिती या प्रसंगी आपल्या प्रास्ताविकातून किशोर बोरकर यांनी दिली आहे..संचालन जगदीश गोवर्धन तर आभार रामेश्वर अभ्यंकर यांनी मानले.प्रमुख अतिथी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर यांच्या हस्ते भारतीय राज्यघटनेच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले.

भारतीय संविधानाने देशाच्या नागरीकांना असंख्य अधिकार दिले व त्याचबरोबर प्रत्येक माणसाने माणसासोबत माणसासारखे वागावे, सौंदार्यता, सहिष्णुता ठेवावी, असे संविधानाला अभिप्रेत असतांना केवळ अधिकार मिळविण्यासाठी संघर्ष करण्यात येतो, म्हणून अधिकार मिळविण्याबरोबर माणसाने माणसासोबत सौंदार्यतेने वागण्याची विनंती याप्रसंगी किशोर बोरकर यांनी केली.

# डॉ. बोंडे यांच्यावरील दगडफेकीची चौकशी करा

## भाजपाचे विविध ठिकाणी निवेदन

**दि. २८ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती** – भाजपा ग्रामीण जिल्हाध्यक्ष खा. अनिल बोंडे यांच्यावर तिवसा येथे शंकरपटात अज्ञात व्यक्तीने दगडफेक केली. या घटनेचा निषेध जिल्ह्यातल्या भाजपा कार्यकर्त्यांकडून होत आहे. सदर घटनेची चौकशी करून दोषींवर कारवाईची मागणी करण्यात आली आहे.

**हल्लेखोरांना अटक : राजेश वानखडे**

भाजपा जिल्हाध्यक्ष खा. बोंडे यांच्यावर झालेल्या दगडफेकीचा तीव्र निषेध. दगड फेकणारा नेमका कोण याचा मागमूस अद्याप लागला नसून ड्रोन कॅमेर्‍याचे फुटेज घेऊन हल्लेखोरांची ओळख पटवावी व त्याना अटक करावी अशी मागणी भाजपाचे तिवसा विधानसभा प्रमुख राजेश वानखडे यांनी तिवसा पोलिसांना दिलेल्या निवेदनातून केली आहे. निवेदन देताना जिल्हा उपाध्यक्ष प्रदीप गौरखेडे, मंडळ अध्यक्ष निलेश श्रीखंडे, अतुल उर्फ पप्पू देशमुख, शंतनू देशमुख, अनिल थुल, दिनेश लांडगे, सुधीर वानखडे, अंकुश देशमुख, राजेश बावरी, शुभम बोथे, चेतन बनसोड, सिकंदर सिंग, करण सिंग बावरी, युवा मोर्चा तालुका सचिव अनिकेत वानखडे, तुफानसिंग बावरी, सुधाकरराव वेरुळकर, राहुल वानखडे, सुलतान सिंग बावरी, आकाश सिंग बावरी, लखनसिंग टाक, पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

### भातकुलीतही ठाणेदारांना निवेदन

दरम्यान, दगडफेक निषेधार्थ सोमवारी भातकुली येथील ठाणेदारांना भाजपा तालुका शाखेच्यावतीने निवेदन देण्यात आले. दोषींवर तात्काळ कारवाई करून अटक करण्यात यावी, अशी मागणी या निवेदनाच्या माध्यमातून करण्यात आली. यावेळी तालुकाध्यक्ष सोपान गुडधे, तालुका सरचिटणीस योगेश उघडे, ओबीसी मोर्चा अध्यक्ष उमेश भुसारी, तालुका उपाध्यक्ष बाळा भजभुजे, नगरसेवक सतीश आठवले, अनुसूचित जाती मोर्चा अध्यक्ष रितेश माकोडे, युवा मोर्चाचे यश शिरोळे, वैभव गुडधे, सादिक भाई उपस्थित होते.



### अचलपुरात निषेध

खा. डॉ. अनिल बोंडे यांच्यावर झालेल्या दगडफेकीचा निषेध करून अचलपूर तालुका व शहर भारतीय जनता पक्षाच्या वतीने शहर भाजपा अध्यक्ष कुंदन यादव यांच्या नेतृत्वात उपविभागीय पोलिस अधिकार्यांना निवेदन देण्यात आले. तिवसा येथे झालेल्या भ्याड हल्ल्याच्या निषेधार्थ निवेदन देण्यात आले. हल्लेखोरांना त्वरित अटक करून त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात यावी व गुन्हे दाखल करण्यात यावे अशी विनंती निवेदनाद्वारे करण्यात आली. यावेळी गजानन कोल्हे, प्रवीण तायडे, सुधीर रसे, विनिता धर्मा, शंकर भाषानी, नीलेश नागापुरे, रुपेश लहाने, राजेंद्र जयस्वाल, अभय माथने या पदाधिकार्यांसह कार्यकर्ते उपस्थित होते.

# ...अन्यथा राजीनामा द्या, बच्चू कडू यांचं थेट भुजबळांना आव्हान

**दि.२८ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती** आरक्षणासाठी मुख्यमंत्र्यांनी स्थापलेल्या शिंदे समितीचं काम आता संपलंय. त्यामुळे या समितीचा अहवाल आम्ही मान्य करणार नाही, अशी आक्रमक भूमिका छगन भुजबळ यांनी मांडली. भुजबळांच्या या वक्तव्याला प्रहार संघटनेचे नेते बच्चू कडू यांनी सडेतोड प्रत्युत्तर दिलंय. शिंदे समिती रद्द करा अन्यथा राजीनामा द्या, असं म्हणत बच्चू कडू यांनी छगन भुजबळ यांना खुलं आव्हान दिलंय.

मराठा आरक्षणावरून छगन भुजबळ आणि मनोज जरांगे पाटील हे दोन्ही नेते आमने–सामने आले आहेत. दोन्ही नेत्यांकडून एकमेंकावर जोरदार टीका केली जात आहे. छगन भुजबळ यांनी पुण्यात पत्रकार परिषद घेतली. यावेळी त्यांनी मराठा आरक्षणावर आपली भूमिका मांडली.

मराठ्यांना सरसकट कुणबी प्रमाणपत्र देण्यास आमचा विरोधच असेल, असं छगन भुजबळ म्हणाले. भुजबळांनी घेतलेल्या भूमिकेवर राजकीय वर्तुळातून अनेक प्रतिक्रिया उमटत आहेत.

हिंगोलीत पार पडलेल्या ओबीसी एल्गार मेळाव्यातून ओबीसी महासंघाचे अध्यक्ष बबनराव तायवाडे यांनी प्रक्षोभक विधान केलं होतं. तायवाडे यांनी हातपाय कापून ठेवण्याची भाषा केली होती. ते म्हणाले होते की,

''आम्ही ओबीसी शांतपणे जगणारे लोक आहोत.''



उपस्थित लोकांना संबोधित करून ते म्हणाले, ''ओबीसींचा अपमान कोणी केला तर त्याची हातपाय कापून ठेवण्याची ताकद ठेवा. यावर आता बच्चू कडू यांनी प्रतिक्रिया देत तायवाडे यांना इशारा दिलाय.

ते म्हणाले आहे की, ''हातपाय कापणं सोप्प आहे, त्याला ताकद लागत नाही. हातपाय जोडण्याचं काम केलं पाहिजे. भुजबळ यांनी इतके वर्ष राज्य केलं. त्यांनी कापण्यापेक्षा लोकांना जोडता कसं येईल, हे पाहायला हवं.''

# अमरावतीसह विदर्भातील अनेक जिल्ह्यांत वादळी पाऊस

### थंडीत वाढ होण्याची शक्यता

**दि. २८ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**– सोमवारी सकाळपासून विदर्भातील अनेक जिल्ह्यांमध्ये पावसाने पुन्हा जोरदार हजेरी लावले आहे. थंडीच्या दिवसात अवकाळी पावसाने अनेकांची तारांबळ उडाली आहे. हवामान विभागानुसार हा पाऊस पुढील दोन दिवस तरी पाठलाग सोडणार नसल्याचा इशारा देण्यात आला आहे. आज सकाळी विदर्भातील नागपूर, गोंदिया, चंद्रपूर, अकोलासह अनेक जिल्ह्यांमध्ये पावसाने हजेरी लावली. परिणामी गारठा



वाढला असून स्वेटर घालावे की रेनकोट असा प्रश्न अनेकांना पडला आहे.

अमरावती जिल्ह्यात रविवार, २५ नोव्हेंबरच्या मध्यरात्रीपासून अवकाळी पावसाला जोरात सुरवात झाली. सोमवारी सकाळी ११.३० पर्यंत पाऊस सुरूच होता.तर मंगळवारी सुद्धा पावसाने पहाटे ४ वाजल्यापासून सकाळी ८ पर्यंत जोरदार हजेरी लावली या पावसाने तुरीच्या पिकाला फटका बसणार आहे. हवामान विभागाने राज्यात तीन दिवस अवकाळी पावसाची शक्यता वर्तविली होती. रविवारी दुपारनंतर ढगाळ वातावरण तयार झाले होते. मध्यरात्रीच्या सुमारास जिल्ह्याच्या विविध भागात तसेच अमरावती शहरात अवकाळी पावसाने हजेरी लावली. या पावसाचा तुरीच्या व कपाशी पिकाला फटका बसणार आहे. रब्बी हंगामातील कांदा, हरभरा, गहू पिकासाठी हा पाऊस लाभदायक ठरू शकतो. पावसाने थंडीत वाढ होण्याची शक्यता वाढली आहे.

# सर्व कामे बाजूला ठेवून संकटात असलेल्या शेतकऱ्याला तातडीने भरीव मदत करा – नाना पटोले

**दि. २८ विदर्भ प्रजासत्ताक मुंबई,** आस्मानी व सुलतानी संकटात सापडलेला राज्यातील बळीराजा भाजपा सरकारकडे मदतीसाठी याचना करत आहे पण या सरकारला शेतकऱ्यांचे दुःख दिसत नाही. भाजपा सरकारमुळे शेतकऱ्यांवर अवयव विकण्याची वेळ आली असून मुंबईत सरकारच्या दरबारात शेतकरी मदतीची वाट पहात आहे. केंद्र सरकारकडे २५०० कोटी रुपये मागितल्याचे अर्थमंत्री सांगत आहेत पण जाहीरातबाजी व इव्हेंटबाजीवर उधळपट्टी करण्यासाठी सरकारकडे पैसे आहेत आणि शेतकऱ्यांना द्यायला नाहीत का? असा संतप्त प्रश्न विचारत शेतकऱ्यांचा उद्रेक सरकारला परवडणार नाही, असा इशारा महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी दिला आहे.



काँग्रेस मुख्यालय टिळक भवन येथे प्रसार माध्यमांशी बोलताना नाना पटोले यांनी भाजपा सरकारवर तोफ डागली, ते पुढे म्हणाले की, दुष्काळाने शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले असताना दोन दिवसात पडलेल्या अवकाळी पावसाने शेतकऱ्यांचे पुन्हा मोठे नुकसान केले आहे. यावर्षीचे दोन्ही हंगाम वाया गेल्याने शेतकरी पुरता हतबल झाला आहे. दुष्काळ जाहीर करण्यातही भाजपा सरकार राजकारण करत आहे. संकटात सापडलेल्या शेतकऱ्याला भरीव मदत देऊन सरकारने त्यांना संकटातून बाहेर काढले पाहिजे पण शेतकऱ्याला मदत कतानाच सरकार हात आखडता घेत आहे. भाजपा सरकार हे शेतकरीविरोधी, निर्ढावलेले सरकार आहे, या सरकारला अधिवेशनात जाब विचारून शेतकऱ्यांना मदत देण्यासाठी काँग्रेस पाठपुरावा करेल. शेतकऱ्यांनी मात्र कोणतेही टोकाचे पाऊल उचलू नये असे आवाहन पटोले यांनी केले आहे.–

# हिवाळी अधिवेशन काळात खोदकाम नको, महावितरण चे आवाहन

**दि.२८ विदर्भ प्रजासत्ताक नागपूर:** नागपुरात ७ डिसेंबरपासून हिवाळी अधिवेशन सुरू होणार आहे. या काळात कुठल्याही यंत्रणेने शहरात खोदकाम करू नये. असे महावितरणचे म्हणणे आहे. हिवाळी अधिवेशनात अखंडित वीजपुरवठ्यासाठी महावितरणने काम सुरू केले आहे.

नागपूर शहरात आज मेट्रो, सार्वजनिक बांधकाम विभाग, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, पाणीपुरवठा, महानगरपालिका, दूरसंचार विभाग, खासगी इंटरनेट आणि केबल टीव्ही कंपन्या यांसारख्या अनेक विभागांमार्फत मोठ्या प्रमाणात विकास कामे सुरू आहेत. त्यासाठी मोठ–मोठ्या ड्रील मशिनसच्या सहाय्याने खोदकाम केले जात आहे. या



कामांमुळे भूमिगत वीज वितरण यंत्रणेचे नुकसान होत असून अनेकदा वीजपुरवठा खंडित होतो. कंत्राटदार लवकर काम करण्यासाठी इतर विभागाशी समन्वय टाळतो. त्यामुळे वीज यंत्रणेला धोका संभावतो. त्यामुळे ही कामे अधिवेशन काळात करू नये, असे आवाहन महावितरणने केले.दरम्यान, महावितरणचे प्रादेशिक संचालक सुहास रंगारी, मुख्य अभियंता दिलीप दोडके, अधीक्षक अभियंता अमित परांजपे आणि इतर अधिकाऱ्यांनी सोमवारी विधिमंडळ, राजभवन, रवीभवन, नागभवन आणि इतरही भागांतील विविध उपकेंद्रांना भेट देत तेथील संपूर्ण व्यवस्थेचा आढावा घेतला.

# तिवस्यात सराफा व्यावसायिकाची घरात घुसून हत्या

## घरांमधून सोने- पैसे पूर्ण चोरीला गेल्याची माहिती

दि.२८ विदर्भ प्रजासत्ताकतिवसाशहरातील त्रिमूर्ती नगरात राहणाऱ्या एका ५५ वर्षीय सोनाराचा व्यवसाय करणाऱ्या व्यक्तीचा सोमवारला २७ नोव्हेंबर रोजी भरदिवसा खून झाल्याची घटना उघडकीस आली आहे. संजय भगवंत मांडळे असे मृतक सराफा व्यावसायिकाचे नाव आहे. चोरीच्या उद्देशातून खून झाल्याची परिसरात चर्चा होत आहे. घटनेची माहिती मिळताच तिवसा पोलीसांनी धाव घेत पंचनामा करून मृतदेह पोस्टमॉर्टमसाठी रवाना केला असून आरोपींचा शोध सुरु केला आहे.सराफा व्यावसायिक संजय मांडळे यांच्या निवासस्थानी घटना घडली तेव्हा त्यांचे वयोवृद्ध वडील भगवंतराव मांडळे (८२) घरीच होते. त्यांच्या डोळ्यांनी कमी प्रमाणात दिसते. आजारी असल्यामुळे ते बेडवरच राहतात. संजय मांडळे यांच्या पत्नी डायलेसिससाठी अमरावतीला गेल्या होत्या. तर संजय यांच्या शेजारी राहणारे त्यांचे भाऊ विजय मांडळे हे सहपरीवार परतवाडा येथे गेले होते. संजयमांडळेहेएकटेच घरी असल्याचे पाहून डाव साधल्याची माहिती आहे. कुण्या ओळखीच्याच व्यक्तीनी हे हत्याकांड



घडविले असल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.

अज्ञात आरोपींना त्यांच्या घरात प्रवेश केला. आरोपी घरात का घुसले आणि का शिरले, याबाबत माहिती नसली तरी चोरीच्या उद्देशातून खून झाल्याची परिसरात चर्चा आहे. मात्र घरांमधून सोने व पैसे पूर्ण चोरीला गेल्याची प्राथमिक माहिती पोलिसांना मिळालेली आहे.

# निवडणूक कोण जिंकणार? लागली लाखाची पैज,

## स्टॅम्प पेपरवर शपथपत्र केले तयार, साक्षीदारांनीही केल्या स्वाक्षऱ्या

**दि. २८ विदर्भ प्रजासत्ताक भोपाळ** – निवडणुकीच्या निकालांची सर्वांचा प्रचंड उत्सुकता असते. एवढी, की काहीजण चक्क पैज लावतात. आता मध्य प्रदेशचेच घ्या. तेथे मतदान झाले आहे. पण, जिंकणार कोण? यावर लोकांनी पैजा लावायला सुरुवात केली. दोन जणांनी तर तब्बल एक लाख रुपयांची पैज लावली असून, तसे शपथपत्रही करून घेतले आहे. त्यावर पाच साक्षीदारांनीही स्वाक्षऱ्या केल्या आहेत, हे विशेष. जो पैज हरेल तो दुसऱ्याला १ लाख रुपये देईल, असे शपथपत्रात म्हटले आहे. दोघांनीही प्रत्येकी एक लाख रुपयांचे धनादेश अमित पांडे या साक्षीदाराकडे जमा केले आहेत.

**या हॉटसीटवर १० लाखांची पैज**–छिंदवाडामध्ये माजी मुख्यमंत्री कमलनाथ हे



काँग्रेसचे उमेदवार आहेत. त्यांच्यावर छिंदवाडामध्येच प्रकाश साहू आणि राम मोहन साहू यांनी १० लाख रुपयांची पैज लावली आहे.

– प्रकाश साहू यांनी भाजप उमेदवार बंटी साहू यांच्यावर डाव खेळला आहे. तर राम मोहन यांनी कमलनाथ यांच्या विजयावर पैज लावली आहे.

– या पैजेसाठीही शपथपत्र तयार करण्यात आले असून, तीन साक्षीदारांनाही सहभागी करण्यात आले आहे.

### साक्षीदाराकडे पैजेचे धनादेश केले जमा

छिंदवाडा जिल्ह्यातील सुखापुरा गावातील धनीराम भलावी आणि नीरज मालवीय यांच्यात ही पैज लागली आहे. भलावी यांनी मध्य प्रदेशात काँग्रेसच्या सरकार स्थापनेचा तर मालवीय यांनी भाजपच्या सरकार स्थापनेचा दावा केला आहे.

आता लोकप्रिय असलेल्या सांध्य दैनिक

विदर्भ प्रजासत्ताक

मध्ये छोट्या जाहिरातीसाठी संपर्क करा

मो.८६२४९८५६३३

घर विकणे,नोकरी विषयक,सहल यात्रा,पाहिजेत,भाड्याने देणे आहे या प्रकारच्या छोटी जाहिरात१० ओळीची मिनी ऍड फक्त ५०/– रु मध्ये प्रति दिवस तेही बोल्ड बॉक्स मध्ये चार दिवसानंतर एक दिवस फ्री..

# १ डिसेंबरपासून तहसीलदारांचे काम बंद दाखले मिळण्यात अडचणींची शक्यता

**दि.२८विदर्भ प्रजासत्ताक**
**अमरावती**

मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री तसेच अर्थमंत्र्यांनी आदेश दिल्यानंतरही 'ग्रेड पे' ची अंमलबजावणी न केल्याच्या निषेधार्थ अमरावतीसह राज्यभरातील तहसीलदार, नायब तहसीलदारांनी येत्या १ डिसेंबरपासून काम बंद आंदोलनाचा इशारा दिला आहे. महाराष्ट्र राज्य तहसीलदार व नायब तहसीलदार संघटनेचे राज्याध्यक्ष सुरेश बगळे आणि महाराष्ट्र राज्य महसूल कर्मचारी संघटनेचे राज्य कार्याध्यक्ष लक्ष्मण नरमवार तसेच संघटनेच्या इतर पदाधिकाऱ्यांनी हा इशारा दिला आहे.



राज्यभरातील तहसीलदार व नायब तहसीलदार यांनी विविध मागण्यांसाठी यापूर्वी ३ मार्चला बेमुदत कामबंद संप पुकारला होता. त्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तहसीलदार संघटनेची मागणी मान्य करत स्वाक्षरी करून राजपत्रित वर्ग २ यांचे ग्रेड पे ४,८०० रुपये वाढवण्याच्या प्रस्तावास मंजुरी दिली होती. मात्र अपर मुख्य सचिव यांनी अद्याप अंमलबजावणी केली नसल्याचा आरोप तहसीलदार आणि नायब तहसीलदार संघटनेने केला आहे. महसूल खात्यातील तहसीलदार, नायब तहसीलदार यांच्यावर वेळोवेळी अतिरिक्त जबाबदाऱ्या टाकून त्यांना वेगवेगळी कामे सांगितली जातात. त्यानुसार ती केलीही जातात. परंतु पगार वाढीच्या बाबतीत मात्र दिरंगाई केली जात आहे. त्यामुळेच नाईलाजाने आम्ही काम बंद आंदोलनाचा निर्णय घेतला, असे तहसीलदार, नायब तहसीलदारांच्या संघटनेचे म्हणणे आहे. दरम्यान या आंदोलनात सर्व पदाधिकारी, सदस्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहनही करण्यात आले आहे.

### दाखले मिळण्यात अडचणी

या बेमुदत कामबंद आंदोलनामुळे शेतकरी आणि शालेय विद्यार्थ्यांना शासकीय दाखल्यांपासून वंचित राहावे लागण्याची शक्यता वर्तवण्यात आहे. त्याचबरोबर 'शासन आपल्या दारी' या उपक्रमाला देखील फटका बसणार आहे. आंदोलनामुळे नागरिकांना शासकीय दाखले मिळवण्यासाठी ताटकळत राहावे लागणार आहे.

# पश्चिम विभाग आंतर विद्यापीठ व्हॉलिबॉल (पुरुष) स्पर्धेकरीता विद्यापीठ चमू घोषित

**दि.२८ विदर्भ प्रजासत्ताक**
**अमरावती**

स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथे दिनांक १४ ते १८ डिसेंबर, २०२३ दरम्यान होणाऱ्या पश्चिम विभाग आंतर विद्यापीठ व्हॉलिबॉल (पुरुष) स्पर्धेसाठी संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा संघ घोषित करण्यात आला आहे. निवड झालेल्या खेळाडूंचा प्रशिक्षणवर्ग डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन, अमरावती येथे दि. ०२ ते १२ डिसेंबर दरम्यान होणार आहे.

निवड झालेल्या खेळाडूंमध्ये साळुंकाबाई राऊत महाविद्यालय, वनोजाचा अब्दुल मुफिज व रिजवान शाह, श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावतीचा सुहास वानखडे, सचिन बिसनदवे व ए. तन्वीर, अमोलकचंद महाविद्यालय, यवतमाळचा शेख आयन, डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन, अमरावतीचा अनंत सांडिल्य, प्रणव बोरकर, राहुल राय, विक्रम कुमार व मेहुलकुमार सिंह, नेहरू महाविद्यालय, नेर परसोपंतचा रिजवान उल्लाखान, कला व विज्ञान महाविद्यालय, कुऱ्हाचा अभिजित दाभाडे व संकेत राऊत, एस.पी.एम. विज्ञान व गिलानी कला, वाणिज्य महाविद्यालय, घाटंजीचा पियुष जांभुळकर आणि श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोलाचा शुभम मुळे यांचा समावेश आहे.

# केवळ चमचमीत जेवणच नाही तर किचनही ठेवा चकचकीत

## अमरावतीकरांची अपेक्षा : अन्न व औषध प्रशासनाला कारवाईचे अधिकार

**दि.२८विदर्भ प्रजासत्ताक**
**अमरावती**

अलीकडे मोठ्या शहरांप्रमाणे अमरावती शहरात ही वीकेंडला हॉटेलमध्ये जेवणकरणाऱ्यांची संख्या वाढली, चमचमीत जेवण करण्याकडे मध्यमवर्गीयांचा कल वाढू लागला. मात्र, हॉटेलमधील किचन चकचकीत असते काय, याचाही विचार करणे काळाची गरज आहे. हॉटेल मालकांनी किचन चकचकीत ठेवले नाही तर ग्राहकांनी तक्रार केल्यास अन्न व औषध प्रशासनाकडून कारवाईला सामोरे जावे लागणार आहे.



हॉटेल किचन हे फूड सर्व्हिस ऑपरेशनचे हृदय आहे. कच्चे व शिजवलेले अन्न साठवले जाते, तयार केले जाते व सेवेसाठी प्लेट केले जाते ते त्यानुसार डिझाइन केले जाते. मेनू आणि कार्ये यावर अवलंबून असते. हॉटेल व रेस्टॉरंटचे किचेन कसे असावे, यासाठी अन्न सुरक्षा आणि मानके कायद्यात नियमावली दिली. मात्र या नियमावलीचे सर्रास उल्लंघन होत असून नागरिकांच्या जिवाशी खेळ सुरूअसल्याचे वास्तव आहे. स्वयंपाकासंबंधी स्वच्छता, अन्न व्यवस्थापन व स्वयंपाक करण्याच्या

पद्धती ठरवून दिल्या आहेत. जे अन्न कदूषित होण्यास प्रतिबंध करतात, अन्न विषबाधा रोखतात आणि इतर अन्न, न मानव किंवा प्राण्यांमध्ये रोगाचा प्रसार या कमी करतात. स्वयंपाकासंबंधी स्वच्छता पद्धती, अन्न हाताळणे व साठवण्याचे, तयार करण्याचे, सर्व्ह करण्याचे आणि खाण्याचे सुरक्षित मार्ग नियमाने ठरवून दिले आहेत. मात्र, हॉटेल व्यावसायिक स्वच्छता पाळतीलच, याची खात्री नसते. अनेकदा अन्न-औषध विभाग कारवाई करत असते. त्यामुळे ग्राहकांनी काळजी घेणे अत्यावश्यक आहे.

### हॉटेल्सला कारवाईपूर्वी एकदा दिली जाते संधी

हॉटेल्स मालकांनी किचनमध्ये स्वच्छतेचे नियम पाळले नाही तर अन्न व औषध प्रशासनाच्या पथकाला कारवाई करण्याचे अधिकार आहेत. तपासणी केल्यानंतर चुका आढळल्यास लगेच कारवाई न करता नियमानुसार सुधारणेसाठी एकदा संधी दिली जाते.

**अन्न व औषध प्रशासन ,अमरावती**

# तुतीची लागवड करा, साडेतीन लाखांचे अनुदानही मिळवा

## महारेशीम अभियान : टसर रेशीमसाठी ७५ टक्के अनुदान

**अरुण जोशी**

**दि.२८विदर्भ प्रजासत्ताक**
**अमरावती**

रेशीम शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी राज्य शासनाच्या वतीने महारेशीम अभियान राबविले जात आहेत. या अभियानाअंतर्गत टसर रेशीम लागवडीसाठी ७५ टक्के अनुदान, तर तुती लागवडीसाठी साडेतीन लाखांचे अनुदान दिले जाते. या अनुदानाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना आर्थिक भरभराट करण्याची संधी आहे.

जिल्ह्यात तुती लागवडीखालील क्षेत्र नसले तरी टसर रेशीम शेती केली जाते. बडनेरा जिल्हा रेशीम कार्यालय आहे. येथील कार्यालयामार्फत शेतकऱ्यांना टसर रेशीमची शेती करण्यासाठी प्रोत्साहन दिले जाते. तुती लागवडीसाठीसुद्धा शेतकऱ्यांना आवाहन केले जात आहे. इच्छुक शेतकरी रेशीम कार्यालयाशी संपर्क साधून तुतीची लागवड करून साडेतीन लाखांपर्यंत अनुदान प्राप्त करू शकतात. रेशीम लागवडीला प्रोत्साहन मिळण्यासाठी महारेशीम अभियान राबविले जात आहे.तुती लागवडीसाठी पाण्याचा योग्य निचरा होणारी जमीन आवश्यक आहे. या जमिनीवरच तुतीची लागवड करता येते. योग्य प्रकारे पीकसुद्धा या जमिनीत घेता येते.तुतीची लागवड केल्यानंतररेशीम हाती येईपर्यंत मजुरांवर बराचसा पैसा खर्च होतो. यासाठीसुद्धा अनुदान मिळते. एकूण ३ लाख ५० हजार रुपये अनुदान आहे.



### काय आहे महारेशीम अभियान?

रेशीम उद्योगास प्रोत्साहन मिळण्यासाठी, तसेच राज्य शासनाकडून रेशीमसंबंधी राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती मिळावी, यासाठी महारेशीम अभियान राबविले जात आहे.रेशीम शेती कसणाऱ्या शेतकऱ्यांना वर्षाकाठी दीड ते दोन लाखांपर्यंत नफा मिळू शकतो.

### २० डिसेंबरपर्यंत मुदत

रेशीम शेती करू इच्छिणाऱ्या व अनुदानाचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या शेतकऱ्यांना २० नोव्हेंबर ते २० डिसेंबर या कालावधीत नोंदणी करायची आहे. टसर रेशीम शेतकऱ्यांना ही नोंदणी निःशुल्क आहे. तर तुती पात्र शेतकऱ्यांना एकरवर तुती लागवडीसाठी ५०० रुपये नोंदणी शुल्क आकारले जाणार आहे.

जिल्ह्यात टसर रेशीम शेतीला बराच वाव आहे. २५ टक्के लाभार्थी हिस्सा, तर ७५ टक्के अनुदान या शेतीसाठी शासनाकडून मिळते. अंडीपुंज खरेदी करण्यासाठी हे अनुदान कामी येते. त्यामुळे अधिकाधिक शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा.

**– जिल्हा रेशीमविकास अधिकारी,**

# 'ऑनलाइन' खरेदीमुळे बिघडतेय छोट्या व्यावसायिकांचे आर्थिक गणित

## शहरी, ग्रामीण भागात 'क्रेझ' : स्थानिक लहान विक्रेते अडचणीत

**दि.२८ विदर्भ प्रजासत्ताक**
**अमरावती**

प्रत्येकाच्या हातात स्मार्टफोन आल्याने प्रत्येक जण ऑनलाइन राहत आहे. त्याचाच फायदा ऑनलाइन व्यवसाय करणाऱ्या कंपन्यांकडून घेतला जात आहे. वर्षातील महत्त्वाचा सण असणाऱ्या दिवाळीत झालेली उलाढाल लक्षात घेता कंपन्यांनी कमी किमती, आकर्षक सवलतींच्या फेकलेल्या जाळ्यात ग्राहक अडकलेले पाहायला मिळाले. पैसा हातात असणाऱ्यांनी मोठ्या प्रमाणात ऑनलाइन खरेदी केल्याने त्याचा फटका परिसरातील स्थानिक व्यावसायिकांना बसला आहे.




सध्या नागरिकांचा ऑनलाइन खरेदीकडे कल वाढला आहे. तसेच कोरोना संसर्ग टाळण्यासाठी बहुतांश नागरिकांनी ऑनलाइन खरेदीवर भर दिला. त्याची सवयच नागरिकांना लागली. त्यामुळे नागरिकांनी बाजारपेठेकडे पाठ केली आहे. त्याचाही परिणाम बाजारपेठेवर झाला आहे. मौल संस्कृती व ऑनलाइन खरेदीमुळे लहान विक्रेते अडचणीत आहेत, तर अनेक लहान व्यवसायिकांनी आपला व्यवसाय बंद केला आहे. दिवाळीत बाजारपेठा ग्राहकांच्या गर्दीने फुलून जातात. मात्र, ऑनलाइन खरेदीमुळे गर्दी कमी झाल्याचे दिसले.

### ग्रामीण भागातही ऑनलाइन खरेदी

ऑनलाइन ऑफरच्या जाळ्यात नागरिकांना अडकवले जात आहे. ऑनलाइन वस्तू खरेदीकडे शहरीच नव्हे, तर ग्रामीण भागातील ग्राहकांचा कल वाढत चालला आहे. ऑनलाइन वस्तू कमी किमतीत मिळत असल्याचा दावा केला जातो. यात ग्राहकांना तोटाही सहन करावा लागत असल्याच्या तक्रारी आहेत.

# मंत्रालयाचा ताबा घेण्यासाठी शेकडो शेतकऱ्यांसमवेत रविकांत तुपकर मुंबईला रवाना



**दि.२८विदर्भ प्रजासत्ताक बुलढाणा**

कापसाला व सोयाबीनला योग्य हमी भाव मिळावा तसेच शेतक-यांचे अन्य प्रश्न सुटावेत यासाठी उद्या (ता. २९ नोव्हेंबर) लाखो शेतक-यांसमवेत मंत्रालयाचा ताबा घेणार अशी गर्जना केलेले शेतकरी नेत रविकांत तुपकर हे आज (मंगळवार) बुलढाणा जिल्ह्यातून मुंबईस रवाना झाले. सोमठाणा येथून तुपकरांसमवेत शेकडो शेतकरी गाड्यांच्या ताफ्यासह मुंबईकडे कूच करीत आहे.

सोमठाणा येथे रविकांत तुपकर यांचे अन्नत्याग आंदोलन सुरु होते. सकाळी अकराच्या सुमारास ते सोमठाणा येथून बुलढाणा मार्गे मुंबईस निघाले. त्यापूर्वी त्यांना गावातील शेतक-यांनी तसेच ग्रामस्थांनी घोषणाबाजी करुन मुंबईतील आंदोलनास शुभेच्छा दिल्या.रयत क्रांती संघटनेचे नेते सदाभाऊ खोत सप्त खंजेरी वादक सत्यपालं महाराज यांच्यासह अनेकांनी रविकांत तुपकर यांच्या अन्यत्याग आंदोलन स्थळी भेट देत त्यांच्या आंदोलनास पाठिंबा दिला.

**रविकांत तुपकरांचा असा असणार दौरा**

बुलढाणा -सिल्लोड - संभाजीनगर - नगर - चाकण मार्गे लोणावळा. लोणावळा येथे रविकांत तुपकर हे आज (मंगळवार) मुक्कामी असतील. उद्या (ता. २९) सकाळी तुपकर शेतक-यांसमवेत मुंबईतील मंत्रालयाकडे कूच करतील.

# सामाजिक ऐक्यातुनच विकासाचा मार्ग प्रशस्त होईल : आमदार यशोमती ठाकुर

**दि.२८ विदर्भ प्रजासत्ताक**
**तिवसा**

सध्या जाती-जातीमध्ये तेढ निर्माण करून व धार्मिक भावना भडकवून आपला राजकीय स्वार्थ साधून घेण्याच कटकारस्थान सुरु आहे. मात्र हा परिसर वं राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज यांच्या वास्तव्याने पुनीत झाला आहे.म्हणूनच त्यांनी दिलेल्या मानवता हाच खरा धर्म आहे, आणि बंधूभावं हा पुरोगामी विचार अगीकारून.जाती धर्मात तेढ निर्माण करण्याच्या कटकारस्थाना ला बळी पडू नये असे आव्हान आमदार यशोमती ठाकुर यांनी केलं.



त्या तालुक्यातील शिवणगावं इथं पाधन रस्ता सुधारणा वं सूर्यगंगा नदीवरील पुलाच्या बांधकामाच्या भूमिपूजन प्रसंगी बोलत होत्या.यावेळी व्यासपीठावर आमदार बळवंत वानखडे,सभापती कल्पना दिवे, तिवसा तालुकाकाँग्रेस कमेटीचे अध्यक्ष सतीश पारधी, उपसरपंचनंदू पोलगावंडे, पं स सदस्य शरद वानखडे, भारत नेमाडे, राधाकिसन लढा,नगरसेवक वैभव वानखडे, अमर वानखडे, हेमंत कुरवाडे, यशकला कठाळे,धम्मराज खडसे, मुकुंद पुनसे, पंकज कळबे आदी उपस्थित होते.आमदार यशोमती ठाकुर पुढं म्हणाल्या कीं कोविडच्या संकटामुळे महाविकास आघाडी सरकाळात विकासाकामाचा वेग कमी झाला होता. पण त्याचवेळी येथील पूल वं इतर कामानां मजुरी मिळाली होती. मतदारसंघातील विकासासाठी आजवर प्रयत्न केलेत. अजूनही विकासकामे करायची आहेत. मतदारसंघ म्हणजे. मोठं सयुक्त कुटुंब असं मी मानते. इथला प्रत्येक माणूस माझ्यासाठी महत्वाचा आहे.विकास कामात राजकारण आणि पक्षपात आजवर केला नाही आणि करणार नाही.या प्रसंगी शिवणगावं-कोळवन पाधन रस्त्याचं वं सूर्यगंगा नदीवरील पुलाच्या कामाच्या भूमिपूजन त्यांच्या हस्ते करण्यात आलं.

# संत्र्याच्या आयात शुल्कातील निम्मा भार शासनाकडून : देवेंद्र फडणवीस

**दि.२८ विदर्भ प्रजासत्ताकनागपुर १६**

संत्र्याच्या आयात शुल्कातील ५० टक्के प्रतिपूर्ती राज्य शासन करणार, अशी घोषणा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. नागपुरातील ॲग्रोव्हिजन कृषि प्रदर्शनाच्या समारोपीय कार्यक्रमात ते बोलत होते. याप्रसंगी व्यासपीठावर केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, अरुणाचल प्रदेशचे कृषिमंत्री टागे टाकी, उत्तर प्रदेशचे कृषिमंत्री सूर्यप्रताप साही उपस्थित होते.

फडणवीस म्हणाले, बांगलादेशने आयात शुल्क वाढवल्याने संत्री उत्पादक शेतकरी अडचणीत सापडले होते. संत्री पिकाला विदेशाचे दालन निर्यातीसाठी पुन्हा उपलब्ध करण्यासाठी राज्य शासनच ५० टक्के आयात शुल्काची प्रतिपूर्ती उचलणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची अडचण दूर होईल. रासायनिक खतांमुळे जमिनीची पत कमी होत असून शासनाकडून नैसर्गिक शेतीला प्रोत्साहन दिले जात आहे. त्यामुळे या क्षेत्रात चांगले काम करणाऱ्या गुजरातच्या राज्यपालांच्या हस्ते या प्रकल्पाचे नुकतेच उद्घाटन झाले. येत्या तीन वर्षांमध्ये राज्यातील ३५ लाख हेक्टर जमीन नैसर्गिक शेतीखाली आणली जाईल. त्यामुळे नैसर्गिक शेतीचे महत्त्वही वाढेल. पूर्वी नैसर्गिक शेतीमुळे शेती उत्पादनात घट होत असल्याचे गैरसमज होते. परंतु आता नैसर्गिक शेतीनेही चांगले उत्पादन होत असल्याचे अनेक प्रयोग बघायला मिळते, असेही फडणवीस यांनी सांगितले.